
ePaper

# शिवसंग्रामचे अध्यक्ष विनायक मेटे यांचे भीषण अपघातात निधन






| वर्ष - 6 | अंक - 128 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।रविवार।दिनांक 14 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## आतील पानांत


- राष्ट्रवादीला शिरूर कोल्हेंसाठी नव्हे; तर पार्थ पवारांसाठी सुरक्षित करायचा आहे
- विकासकामांसाठी आमदार लांडगे यांचा बैठकांचा 'धडाका'
- त्यांची कितीही कुळं उतरली तरी शिवसेना...", उद्धव ठाकरेंचं भाजपावर टीकास्त्र




मराठा समाज नेहमीच सत्तेतला मानला गेला. पण या राज्यात मराठा शेतकरी, शेतमजूर आहेत. त्या समाजाला न्याय देणारा चेहरा म्हणजे विनायक मेटे होते. आता सत्ता पुन्हा आल्यानंतर त्या समाजासाठी काही करण्याची संधी त्यांना उपलब्ध झाली होती. त्यांचं असं अचानक जाणं हे या समाजाचं मोठं नुकसान आहे.ही अत्यंत दुःखद घटना आहे. विनायक मेटे यांचे निधन हे समाजाचं मोठं नुकसान आहे. हे नुकसान भरून निघणं कठीण आहे.

– विनोद तावडे, भाजपा नेते

भाजपासोबत युती तुटल्यानंतर शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबत युती करत राज्यात महाविकास आघाडी सरकार स्थापन केले होते. या सरकारच्या काळात शिवसेनेच्या आमदारांना दुजाभाव मिळत असल्याची तक्रार अनेकदा गोगावलेंनी उद्धव ठाकरेंकडे केली होती. अखेर एकनाथ शिंदेंसह शिवसेनेच्या ४० आमदारांनी बंडखोरी करत भाजपासोबत युती केली आणि राज्यात नवे सरकार स्थापन केले.

– भरत गोगावले



# पुण्यात बस कंडक्टरचा तुटवडा!

## PMPML च्या सेवेतील 600 ड्रायव्हर्सना नवं ट्रेनिंग

| पीएमपीच्या एकूण बस | १६५० |
| --- | --- |
| वाहकांची संख्या | ४१०० |
| चालकांची संख्या | २९५० |
| नव्याने झालेले वाहक | ६०० |
| दररोज सुट्टी द्यावी | - |
| लागणारे वाहक | ६७० |



पुणे। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पुणे महानगर परिवहन महामंडळा'ला (पीएमपी) बससाठी वाहक अर्थात कंडक्टर कमी पडू लागल्यामुळे ६०० चालकांवर नवी जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यासाठी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, त्यांना प्रशिक्षणही देण्यात आले आहे. आता चालक वाहकांच्या भूमिकेत दिसू लागले आहेत. 'पीएमपी' सध्या १६५० बसच्या माध्यमातून प्रवासी सेवा देत आहे. या बससाठी ४१०० वाहक असले, तरीही त्यांची संख्या अपुरी पडत आहे. अनेक वाहक सेवानिवृत्त झाले, तरी त्यांच्या जागी नवी भरती झालेली नाही. त्यामुळे बसच्या फेऱ्यांना फटका बसत होता. 'पीएमपी'कडून त्यांच्या आणि ठेकेदारांच्या बसवर वाहकांची नेमणूक केली जाते. अलीकडे खासगी ठेकेदारांच्या बसची संख्या वाढत आहे. त्यामुळे चालकांची संख्या पुरेशी होती. त्यामुळे काही महिन्यांपूर्वी 'पीएमपी'ने त्यांच्याकडे बदली, हंगामी आणि रोजंदारीवर कार्यरत; तसेच कायम सेवेत असलेल्या ६०० चालकांना वाहक बनविण्याचा निर्णय घेतला.

चालकांवर वाहकाची जबाबदारी सोपविण्यापूर्वी आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. त्यासाठी त्यांचा बॅच आणि बिल्ला काढणे गरजेचे असते. त्या सर्व गोष्टी पूर्ण करण्यात आल्या आहेत. नव्या ६०० वाहकांना तिकिट काढणे आणि इतर गोष्टींचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

भविष्यात पुन्हा चालकांची आवश्यकता भासल्यास वाहक म्हणून असेल तर ते पुन्हा चालक म्हणूनही काम करू शकणार आहेत. आता 'पीएमपी'कडे चार हजार ७०० वाहक झाले आहेत. 'पीएमपी'ने राखीपौर्णिमेच्या दिवशी प्रवाशांच्या सोयीसाठी १८०० बस रस्त्यावर उतरवल्या होत्या. त्यासाठी नव्याने वाहक झालेल्यांची मोठी मदत झाली. त्यासाठी अनेकांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या होत्या. त्यामुळे 'पीएमपी'ला राखीपौर्णिमेच्या दिवशी चांगला महसूल मिळाला. पीएमपीमध्ये वाहक कमी पडू लागल्यामुळे ६०० चालकांवर वाहकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यासाठी सर्व प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे. त्यांना योग्य ते प्रशिक्षणही देण्यात आले आहे.

**- दत्तात्रय झेंडे, वाहतूक व्यवस्थापक, पीएमपी**

## चिखली परिसरात मोफत ध्वज वाटप उपक्रम

# राष्ट्रीय ध्वज फडकावून 'हर घर तिरंगा' चळवळ मजबूत करा!

## निलेशदादा नेवाळे सोशल फाउंडेशनचा पुढाकार

पिंपरी । महाईन्यूज ।

'श्री. निलेशदादा नेवाळे सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून चिखली, नेवाळे वस्ती, शरदनगर, कोयनानगर, घरकुल, सेक्टर २० येथील परिसरात मोफत ध्वज वाटप करण्यात आले. राष्ट्रीय ध्वज फडकावून 'हर घर तिरंगा' चळवळ मजबूत करा, असे आवाहन यावेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे यांनी केले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या 'हर घर तिरंगा' आवाहनास देशभरातून अतिशय चांगला व उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. 13 ते 15 ऑगस्ट या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनूसार हर घर तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या मोहिमेला बळ देण्यासाठी चिखली परिसरातील सर्व नागरिकांनी घरोघरी तिरंगा फडकवावा असे आवाहन निलेश

भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीस 75 वर्ष पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून असून राज्यातील प्रत्येक नागरिकांच्या घरावर तसेच शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापना, सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था यांच्या इमारतीवर राष्ट्रध्वजाची उभारणी व्हावी, यासाठी आम्ही देखील पुढाकार घेतला. राष्ट्रीय ध्वज फडकावून 'हर घर तिरंगा' चळवळ मजबूत करण्याचे आवाहन आम्ही करत आहोत.

**- निलेश नेवाळे, सामाजिक कार्यकर्ते, चिखली.**



दादा नेवाळे सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आले आहे. यानिमित्ताने नागरिकांना मोफत तिरंगा ध्वज वाटप करण्यात येत आहे. तसेच जनजागृती करण्यात येत आहे.यामध्ये, महिला बचत गट, संस्था, बँका, इमारती, सोसायटी, बैठी घरे, गणेश मंडळे, व्यावसायिक, दुकानदार, भाजीविक्रेते, फळविक्रेते, रिक्षा चालक, खाद्यपदार्थ विक्रेते, हॉटेल्स आदींना मोफत तिरंगा ध्वज वाटप करण्यात येत आहे.

शिरूर मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेसला एकप्रकारे आंदण देण्याचा हा प्रकार आहे.

# राष्ट्रवादीला शिरूर कोल्हेंसाठी नव्हे; तर पार्थ पवारांसाठी सुरक्षित करायचा आहे

## माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांचा गौप्यस्फोट

**। पुणे । महाईन्यूज ।**

पुणे । शिवसेनेने माझा घरचा शिरूर लोकसभा मतदारसंघ सोडून मला पुणे मतदारसंघातून निवडणूक लढण्यासाठी तयारी करा, तसेच शिरूर मतदारसंघात फिरू नका, असे सांगितले. शिरूर मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेसला एकप्रकारे आंदण देण्याचा हा प्रकार आहे. मला दुसऱ्या मतदारसंघात पाठवून येथील विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यासाठी नव्हे; तर पार्थ पवार यांच्यासाठी शिरूर मतदारसंघ सुरक्षित करायचा आहे, असा गौप्यस्फोट माजी खासदार शिवाजीराव आढळराव



पाटील यांनी केला आहे. माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी आज आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागात गावभेट दौऱ्याचा प्रारंभ अवसरी बुद्रूक येथून केला. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले की, महाविकास आघाडी सरकाच्या मागील गेल्या अडीच वर्षांत शिवसैनिकांवर अन्याय झाला आहे. यापुढे मला खासदारकी किंवा इतर कोणतेही पद महत्वाचे नसून माझ्या शिवसैनिकांची कामे मार्गी लागली पाहिजेत. शिरूर लोकसभा मतदार संघातील विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी मी राज्य सरकारकडे आग्रह धरणार आहे.

एकनाथ शिंदे आणि ४० आमदारांनी शिवसेनेत बंडखोरी करत राज्याचे मुख्यमंत्रीपद पटकावले. त्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांना शुभेच्छा देणारा संदेश आढळराव यांनी सोशल मीडियातून प्रसिद्ध केला होता. त्यानंतर शिवसेना नेतृत्वाकडून त्यांना त्या पोस्टसंदर्भात विचारणा झाली होती. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांची शिवसेनेतून हकालपट्टी झाल्याचे शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना'तून प्रसिद्ध झाले होते.


त्यानंतर काही तासातच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडून ती कारवाई मागे घेण्यात आली होती. त्यावेळी ठाकरे यांनी आढळराव यांना मातोश्रीवर येऊन भेटण्याचे निमंत्रण दिले होते.

मातोश्रीवर भेटायला गेल्यानंतर कारवाईसंदर्भातील बातमीबाबत आढळराव यांची समजूत घालण्यात आली होती. त्याचवेळी त्यांना शिरूर लोकसभा मतदारसंघाऐवजी पुणे लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याबाबत सूचित करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर आढळराव यांनी नाराजी व्यक्त करत शिंदे गटात सामील होण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबत बोलताना आढळराव यांनी पार्थ पवार यांचा संदर्भ दिला आहे.

### मतदारसंघात फिरण्याबाबतही निर्बंध घातले

**आढळराव म्हणाले की, मला शिरूर लोकसभा मतदारसंघात फिरण्याबाबतही निर्बंध घालण्यात आले होते. एक प्रकारे शिरूर मतदारसंघ राष्ट्रवादीला आंदण देण्याचा हा प्रकार होता. मात्र, मला दुसरीकडे पाठवून त्यांना पार्थ पवार यांच्यासाठी हा मतदारसंघ सुरक्षित करायाचा आहे, असा गौप्यस्फोटही या वेळी बोलताना केला.**

## स्वातंत्र्यदिनासाठी लोणावळ्यात पर्यटकांची गर्दी



**पुणे । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

स्वातंत्र्यदिनाला जोडून आलेल्या सुट्टयांमुळे वर्षाविहारासाठी पुणे-मुंबईतील पर्यटकांनी लोणावळा, खंडाळा परिसरात गर्दी केली असून मोठ्या संख्येने पर्यटक मोटारीतून दाखल झाल्याने मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर शनिवारी कोंडी झाली. मुंबईहून पुण्याकडे येणाऱ्या मार्गिकेवर वाहनांच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले. पुण्याकडून मुंबईकडे जाणाऱ्या उर्से टोलनाक्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. शनिवार, रविवार, स्वातंत्र्यदिन तसेच पारशी नववर्षाची सुट्टी जोडून आल्याने पर्यटक मोठ्या संख्येने लोणावळा, खंडाळा परिसरात दाखल झाले आहेत. पुण्याच्या तुलनेत वर्षाविहारासाठी मुंबईकर मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. मुंबईहून पुण्याकडे येणाऱ्या मार्गिकेवरील वाहतूक कमालीची संथ झाली असून मोटारींच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले. घाटक्षेत्रात वाहने बंद पडल्याने कोंडी होत आहे. खंडाळा महामार्ग पोलिसांनी कोंडी सोडविण्यासाठी खंडाळा बोगदा येथून मुंबईकडे जाणारी मार्गिका पुण्याकडे येणाऱ्या वाहनांसाठी खुली केली तरी वाहनांच्या रांगा पाच ते सहा किलोमीटरपर्यंत लागल्या.

# पुणे मनपाच्या क्षेत्रीय कार्यालयांकडून अवघ्या अडीच लाख तिरंग्यांचे वितरण

## अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त 'हर घर तिरंगा' मोहिमेच्या उद्देशालाच हरताळ?

**पुणे । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत विविध माध्यमातून महापालिकेला उपलब्ध झालेल्या १२ लाख तिरंग्यांपैकी अवघ्या अडीच लाख झेंड्यांचे वितरण महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांकडून करण्यात आले आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त 'हर घर तिरंगा' मोहिमेच्या उद्देशालाच हरताळ फासला गेल्याचे यानिमित्ताने दिसून येत आहे.**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महापालिकेकडून १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्याअंतर्गत पाच लाख तिरंग्यांचे विनामूल्य वाटप केले जाणार आहे. क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत ३०० केंद्रेही त्यासाठी करण्यात आली आहेत. त्यासाठी महापालिकेने पाच लाख झेंड्यांनी खरेदी केली असून कंपन्यांचा सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) आणि शासनाकडून महापालिकेला एकूण बारा लाख झेंडे उपलब्ध झाले आहेत.

यापूर्वी महापालिकेला उपलब्ध झालेले झेंडे निकृष्ट दर्जाचे असल्याने ते परत पाठविण्याची नामुष्की महापालिकेवर ओढावली होती. मात्र महाालिकेला मिळालेल्या एकूण झेंड्यांपैकी केवळ २० टक्के झेंडेच वितरण योग्य असल्याचे पुढे आले आहे. महापालिकेकडून शहरातील



पंधरा क्षेत्रीय कार्यालयांना चार लाख झेंड्यांचे वितरण करण्यात आले आहे. त्यापैकी शुक्रवारी संध्याकाळ पर्यंत केवळ अडीच लाख झेंड्यांचे वितरण क्षेत्रीय कार्यालयांकडून करण्यात आले. त्यामुळे उर्वरीत झेंडे पुरवठादार ठेकेदारांकडे पाठविण्यात येणार आहेत. शासनाकडून महापालिकेला २ लाख ७१ हजार, कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून पाच लाख झेंडे उपलब्ध झाले आहेत. तर ४ लाख ७५ हजार झेंड्यांची खरेदी महापालिकेने केली आहे. महापालिकेला उपलब्ध झालेल्या झेंड्यांची गुणवत्ता तपासून वितरण केले जात आहे. मात्र उर्वरीत झेंड्यांचे काय करायचे, असा प्रश्न महापालिकेपुढे उपस्थित झाला आहे.

## शहरातील पाणी, रस्ते, कचरा समस्या सोडवण्याचा निर्धार

# विकासकामांसाठी आमदार लांडगे यांचा बैठकांचा ‘धडाका’!

## चालढकल करणाऱ्या महापालिका आधिकाऱ्यांना खडसावले

पिंपरी। ।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी अधिकाऱ्यांनी चालढकल करु नये. प्रशासक काळात रखडलेली कामे तात्काळ मार्गी लावावी. तसेच, तांत्रिक कारणे देत नागरिकांना वेठीस धरू नये. तसेच आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पाचे पाणी शहराला मिळण्याबाबत प्रशासनाची सुरू असलेली चालढकल खपवून घेतली जाणार नाही, अशा शब्दांत भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी महापालिका अधिकाऱ्यांना खडसावले आहे.**



शहरातील रस्ते, पाणी आणि कचरासह विविध प्रकल्पांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. यासाठी भाजपा शहराध्यक्ष महेश लांडगे यांनी ऑटो क्लस्टर येथे संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप, सहशहर अभियंता मकरंद निकम, संजय कुलकर्णी, श्रीकांत सवणे आदी उपस्थित होते.

आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पाचे पाणी सप्टेंबरअखेर पिंपरी-चिंचवडला मिळेल, असा दुजोरा महापालिका अधिकाऱ्यांनी दिला. तसेच, देहुरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा कचरा मोशी कचरा डेपो येथे टाकण्यात येणार आहे. त्याला स्थानिक नागरिकांसह लोकप्रतिनिधींनी विरोध केला आहे. तेथील नागरिकांशी चर्चा करुन जोपर्यंत कॅन्टोन्मेंटचा प्रकल्प तयार होत नाही. तोपर्यंत कचरा टाकण्याबाबत विनंती करावी. त्यासाठी देहुरोड कॅन्टोन्मेंटचे मुख्याधिकारी यांच्यासोबत बैठक लावावी, अशी सूचना आमदार लांडगे यांनी केली.

तसेच, स्पाईन रोड त्रिवेणीनगर येथील रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी बाधीत नागरिकांचे पुनर्वसन प्रक्रिया अत्यंत जलदगतीने होण्यासाठी कमीत कमी जागा मालकीचे पुरावे घेवून त्यांना तातडीने जागा उपलब्ध करुन द्यावी. उर्वरित बाधीत नागरिकांची बाजू समजून घेण्यासाठी कॅम्प लावावा. त्रिवेणीनगर ते तळवडे मुख्य रस्ता २४ मीटर असून, काही ठिकाणी २४ मीटर रस्त्याचे भूसंपादन होत नसल्याने रस्ता रुंदीकरणात अडचणी येत आहेत. त्यामुळे तातडीने कार्यवाही करावी, असे आदेश आमदार लांडगे यांनी दिले आहेत. दरम्यान, टाळगाव चिखली येथील जगद् गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या दुसऱ्या टप्प्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. दुसऱ्या टप्प्याचे काम तातडीने मार्गी लावण्यापूर्वी प्रकल्पाचे सादरीकरण करावे. टाऊन हॉलच्या कामाला गती द्यावी, असे आमदार लांडगे यांनी बजावले आहे.

### दहीहंडी, गणेशोत्सवासाठी एक खिडकी सुविधा...

**कोरोना महामारीमुळे दोन वर्षे सण- उत्सव साजरे करता आले नाही. यावर्षी दहीहंडी आणि गणेशोत्सव सार्वजनिकपणे साजरा होत आहे. त्यामुळे मंडळांसाठी ना- हरकत परवाना देण्यासाठी सुलभ प्रक्रिया ठेवावी. त्यासाठी एक खिडकी सुविधा उपलब्ध करुन द्यावी. पर्यावरण पुरक गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्यावा. यासह शहरातील सोसायट्यांमध्ये अनेक ठिकाणी एसटीपी प्रकल्प बंद अवस्थेत आहेत. याबाबत सर्व्हेक्षण करुन संबंधित बिल्डरवर दंडात्मक करावी. त्याचप्रमाणे एसटीपी जनरेटर, कचरा प्लॅन्ट, सोलर सिस्टीम याबाबत दर्जेदार यंत्रणा बसवणेसाठी बांधकाम व्यावसायिकांना सूचना द्याव्या. २०१६ च्या अगोदर बंधनकारक नव्हते. त्यामुळे त्या सोसायटीतील कचरा उचलण्यासंदर्भात आदेश देणे. सोसायटीधारकांसाठी १०० टक्के पार्किंग उपलब्ध व्हावी. याबाबत नियम करुन नगरविकास विभागाला प्रस्ताव पाठवावा. पर्यावरण संवर्धनाला चालना द्यावी, अशा सूचनाही आमदार लांडगे यांनी केल्या आहेत.**

### गोशाळासाठी आरक्षणाची मागणी...

शहरातील गोवंश संवर्धन आणि उपचार केंद्राबाबत प्रशासनाकडे मागणी करण्यात आली आहे. त्यासाठी चिखली ते चऱ्होली दरम्यान ब्लू लाईनमध्ये महापालिकेच्या ताब्यात आलेले आरक्षणामध्ये गोशाळा विकसित करता येईल का? याबाबत पडताळणी करावी. भोसरी थोरल्या पादूका चौकातील संतशिल्प व म्युरल्सचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे. भोसरीतलहान मुलांचे रुग्णालय आणि ओपीडी संदर्भातील नियोजन तात्काळ करावे आदी सूचना आमदार लांडगे यांनी केल्या आहेत. भोसरीतील कुस्ती संकुल आणि कबड्डी संकुलमधील खेळाडुंना राहण्याची सोय व्हावी. याकरिता १२० बेड क्षमतेचे वसतीगृहाचे काम लवकरात लवकर सुरू करावे. स्ट्रॉम वॉटर लाईनची अपूर्ण कामे पूर्ण करावी आदी सूचनाही आमदार लांडगे यांनी दिल्या आहेत.

### जिल्हाधिकारी कार्यालयाकडेही पाठपुरावा...

यमुनानगर, निगडी भागातील अनेक घरांवर रेडझोनची मार्किंग दाखवली जात आहे. ती दुरूस्त करुन घेण्यासंदर्भात बैठक लावावी. तसेच, संरक्षण विभागाकडून रेडझोनची हद्द निश्चित करणे, तसेच, आंद्रा, भामा आसखेड प्रकल्प, भूसंपादनाबाबत प्रलंबित प्रकरणे, क्रिकेट स्टेडिअम, सफारी पार्क, मोशी आणि पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणासाठी भूसंपादन प्रक्रिया गतीमान करण्यासाठी तसेच चिखली हॉस्पिटल जागेबाबत संबंधित विभागांशी तातडीने बैठक घ्यावी. कॅनबे चौक ते भक्ती-शक्ती चौक हा मार्ग रेडझोन हद्दीतून नव्याने विकसित करण्यासाठी अहवाल सादर करावा. विकासकामांत हयगय नको, अशी ताकीद आमदार महेश लांडगे यांनी अधिकाऱ्यांना दिली आहे. एमएलडी आणि भामा आसखेडमधून १६७ एमएलडी पाणी पिंपरी-चिंचवडला मिळण्यासाठी प्रकल्पाला मंजुरी मिळाली. कोविड आणि लॉकडाउनच्या परिणामामुळे नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यात प्रशासनाला अडचणी आल्या. अखेर सर्व अडचणींवर मात करीत प्रकल्प पूर्णत्वास येत आहे.

रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी बाधीत नागरिकांचे पुनर्वसन प्रक्रिया अत्यंत जलदगतीने होण्यासाठी कमीत कमी जागा मालकीचे पुरावे घेवून त्यांना तातडीने जागा उपलब्ध करुन द्यावी. उर्वरित बाधीत नागरिकांची बाजू समजून घेण्यासाठी कॅम्प लावावा.

त्रिवेणीनगर ते तळवडे मुख्य रस्ता २४ मीटर असून, काही ठिकाणी २४ मीटर रस्त्याचे भूसंपादन होत नसल्याने रस्ता रुंदीकरणात अडचणी येत आहेत. त्यामुळे तातडीने कार्यवाही करावी, असे आदेश आमदार लांडगे यांनी दिले आहेत.

## संपादकीय »

# काश्मीर खोऱ्यातील अतिरेक्यांची घुसखोरी व दहशतवाद्यांचा उन्माद

***देशभर घरोघरी तिरंगा फडकावण्याची लगबग सुरू असतानाच चार जवानांच्या घरी मात्र काश्मीर खोऱ्यातून तिरंग्यात लपेटलेल्या पार्थिवाला अखेरची मानवंदना देण्याची वेळ येणार आहे.***

काश्मीरमध्ये राजौरी जिल्ह्यात दहशतवाद्यांकडून झालेल्या आत्मघाती हल्ल्याचा प्रतिकार करताना लष्कराच्या चार जवानांना वीरमरण आले. या हल्ल्यात दोन दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले असले, तरी आजही सीमेपलीकडून लष्करी तळांना लक्ष्य करण्याचे प्रयत्न सुरूच आहेत. चार वर्षांपूर्वी पठाणकोट, उरी, पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यांच्या जखमा आजही ताज्या आहेत. तेव्हा भारताने शीघ्रगती हल्ल्याने तोडीस तोड उत्तर दिले होते. एकीकडे गलवानमध्ये भारतापुढे आक्रमक चीनचे आव्हान असतानाच काश्मीर खोऱ्यातील अतिरेक्यांची घुसखोरी व दहशतवाद्यांचा उन्माद चालूच आहे. लष्कर-ए-तोयबा व जैश-ए-मोहम्मदच्या कारवाया कमी झाल्या असल्या तरी त्यांना पुरता पायबंद बसलेला नाही. काश्मीर फाइल्स चित्रपटावरून देशभर वाद-प्रतिवादाचे राजकीय वादळ उठले होते; त्याच काळात तेथे काश्मिरी पंडिताची निर्घृण हत्या झाली. स्वातंत्र्यानंतर काश्मीरचे नंदनवन भारताचा भाग बनले, तरीही येथील राजकीय अस्थिरता, फुटीरतावाद्यांचा हैदोस, उपेक्षेची सल आणि त्यावर आपली पोळी भाजून घेणारे स्वार्थी नेते व विविध गटांचे माथेफिरू म्होरके यातून काश्मीर खोऱ्याची सुटका झाली नाही. काश्मीरचे सौंदर्य, तेथील कष्टाळू स्थानिक जनता यामुळे येथे पर्यटन बहरले. मात्र, फुटीरतेमध्येच आपले हित आहे, हे ओळखणाऱ्या गटा-तटांमुळे पर्यटनाची फळे तेथील सफरचंदांइतकी गोमटी होऊ शकली नाहीत. १९९० नंतरच्या दशकात तर पाकिस्तानला काश्मीरच्या भूमीवरचे छुपे युद्ध ही भारतद्वेषावर स्वार होण्याची मोठीच संधी सापडली. भाडोत्री अफगाण दहशतावाद्यांमुळे या छुप्या युद्धाला धार चढली. हजार ठिकाणी रक्तपात करून भारताला सतत जखमी करत राहायचे, हे ते कारस्थान होते. पाकिस्तानच्या इंटर सर्विसेस इंटेलिजन्सने (आयएसाय) त्यासाठी पद्धतशीर आखणी केली व त्यातूनच बॉम्बस्फोट घडवून भारताच्या इतर शहरांमध्येही अस्थिरता माजवली. याची परिणती पुढे समुद्रमार्गे छेडल्या गेलेल्या छुप्या युद्धात झाली आणि सन २००८ मध्ये दहशतवादी हल्ला चढवून मुंबईला ओलिस धरण्यात आले. काश्मीरमध्ये ज्या दहशतवादाने थैमान घातले, तो असा देशव्यापी ठरला. दक्षिण आशियाई दहशतवादविषयक पोर्टलच्या आकडेवारीनुसार एकट्या काश्मीरमध्ये सन २००० ते २०२२ या काळात दहशती हिंसाचाराच्या ११ हजारांहून अधिक घटना घडल्या व त्यात १३ हजार अतिरेक्यांना कंठस्नान घालण्यात आले.

## आनंदी सकाळ

# जेथे जातो तेथे, तू माझा सांगाती'

ईश्वराला भावनेच्या प्रत्येक उदात्त क्षणात वेगवेगळ्या रूपाने अनुभवणे त्याच्या सौंदर्याचा प्रत्येकवेळी नवा अनुभव घेणे, सहस्र ब्रह्यकमळांच्या सुगंधाप्रमाणे या अनुभव आनंदात न्हाऊन निघणे, याची तुलना जगातल्या कोणत्याही सुखाशी होऊ शकत नाही. म्हणून सर्व संत, सिद्धांनी मोक्ष नाकारून 'पुन्हा पुन्हा भक्त जन्म मिळू दे, ईश्वराची अगाध चरणसेवा घडू दे' असे आराध्याजवळ मागणे केले. नारदभक्तिसूत्रात अशा भक्तिप्रेमाचे वर्णन -'अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपं मूकास्वादनवत् प्रकाशते क्वापि पात्रे...' असे केले आहे. परब्रह्य सर्वव्यापी, सर्वशक्तिमान, दुष्टदलन, चक्रपाणी, सर्वान्तरयामी, करूणानिधान आहे. त्याचबरोबर परमतत्त्वरूप, आराध्य इष्टदैवत परमप्रेमस्वरूप, माधुर्याचा सागर, परमानंदमय आहे. भक्तासाठी निर्विकार, निर्गुण ब्रह्य, परप्रेमाचा अहर्निश साक्षात्कार बनून प्रेमाचा भुकेला असतो. भक्ताच्या या प्रेमासाठी, प्रेमाच्या अपूर्व सुखासाठी वैकुंठ त्यागून परब्रह्य भक्ताच्या सान्निध्यात रमतो.

## भूमिका

# देशात उच्च मानांकित स्पर्धा अधिकाधिक भरवल्या जाण्याची गरज



संजय राठोडांचा एकेरी उल्लेख करत पूजा चव्हाणच्या आजीची शिंदे सरकावर टीका; म्हणाल्या, "पोलीस क्लीन चीट देऊ शकतात पण तो..."

'चेन्नईतले बुद्धिबळ ऑलिम्पियाड आजवर झालेल्यांपैकी सर्वाधिक सुनियोजित म्हटले पाहिजे', अशी सार्वत्रिक प्रतिक्रिया या स्पर्धेसाठी आलेले बहुतांश पाहुणे मायदेशी पोहोचल्यानंतर व्यक्त करतात, ही आपल्यासाठी समाधानकारक आणि अभिमानास्पद बाब. चेन्नईपासून काही अंतरावर असलेल्या मामल्लापुरम येथे ही स्पर्धा प्रत्यक्ष खेळवली गेली. त्यासाठी जगभरातून १८६ देशांचे १७०० खेळाडू, प्रशिक्षक, सहायक भारतात आले होते. ऑलिम्पियाड स्पर्धेचे आयोजन हे बहुविध खेळांच्या स्पर्धेप्रमाणेच आव्हानात्मक समजले जाते, कारण नियोजनाचा भार सहसा एका शहराच्या आणि राज्याच्या प्रशासनाला उचलावा लागतो. त्या आघाडीवर तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन आणि त्यांच्या प्रशासनाची कामगिरी खणखणीत होती. स्टॅलिन सरकारमधील अत्यंत वरिष्ठ नोकरशहा संयोजनकार्यासाठी तैनात होते. स्थानिक प्रशासन, कॉर्पोरेट विश्व, असंख्य प्रशिक्षित कार्यकर्ते असा फौजफाटा ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी निगुतीने राबला. माजी जगज्जेता आणि महान बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद हा तमिळनाडू किंवा चेन्नईचा आहे या वास्तवापाशी आत्मसंतुष्ट न राहता, त्याच्या देदीप्यमान कारकीर्दीला शोभेसे संयोजन चेन्नईने करून दाखवले. इतर सर्व शहरांसाठी आणि राज्य सरकारांसाठी त्यामुळेच हे ऑलिम्पियाड आदर्शवत ठरावे. या ऑलिम्पियाडची आणखी एक गंमत म्हणजे, मुळात ते चेन्नईत होणारच नव्हते. २०२० मध्ये ते रशियात होणार होते. त्या वेळी करोनामुळे ते लांबणीवर पडले आणि यंदाच्या वर्षी युक्रेनवर रशियाने हल्ला केल्यामुळे त्या देशाकडून यजमानपदच काढून घेण्यात आले. ऐन वेळी यजमानपद कोणाला द्यायचे याचे उत्तर भारतीय बुद्धिबळ संघटनेचे सचिव भारतसिंह चौहान यांनी दिले. ही स्पर्धा भारतात भरवून दाखवण्याचे आश्वासन त्यांनी दिले. भारतातून दिल्ली, गुजरात आणि तमिळनाडू या राज्यांनी रस दाखवला. त्यातही तमिळनाडूने १०० कोटी रुपयांची हमी तातडीने देऊन आणि असा तसा निधी तत्परतेने उभा करून बाजी मारली.

# नितीश कुमारांची बिहारमधली लोकप्रियता सातत्याने घसरतेय...

**आणीबाणीनंतर १९७७ मध्ये प्रथमच भारतात काँग्रेसेतर केंद्र सरकार आले. त्यानंतर केंद्रात दर काही वर्षांनी काँग्रेसला वगळून किंवा नंतर शक्तिमान झालेल्या भाजपला वगळून आघाडी सरकार आले.**

विश्वनाथ प्रतापसिंह, चंद्रशेखर, एच. डी. देवेगौडा आणि इंदरकुमार गुजराल हे चार काँग्रेसेतर आणि त्याचवेळी भाजपेतर पंतप्रधान देशाने पाहिले. मात्र, या चौघांचाही कार्यकाळ अत्यंत मर्यादित राहिला. मोरारजी देसाई आणि चरणसिंह यांच्या पहिल्या काँग्रेसेतर सरकारांच्या पुढे या जणू दोन आवृत्त्या निघाल्या. अटलबिहारी वाजपेयी यांची लागोपाठ दोन सरकारे पडली. पण तिसरे टिकले. मुदत पूर्ण करणारे ते पहिले काँग्रेसेतर सरकार. त्याआधी नरसिंह राव यांनी अभूतपूर्व जुळवाजुळव करून देशाचा आर्थिक गाडा रुळावर आणला होता. आता २०२४ मध्ये भाजपसमोर काँग्रेससहित सर्व विरोधकांची बडी आघाडी उभी राहते का आणि ती मोदींच्या सिंहासनाला सुरुंग लावू शकते का, हा प्रश्न नितीशकुमार यांच्या नव्या घरोब्याने निर्माण झाला आहे. महाराष्ट्रातली भाजप विरोधकांची



सत्ता गेल्यानंतर बिहारमधली भाजपची अर्धसत्ता जावी, हा विरोधकांच्या मनात नवा उत्साह पेरणारा घटनाक्रम आहे. बिहार हे उत्तर भारतातले मोठे, राजकीयदृष्ट्या जागृत राज्य आहे. बिहारमधून १४ मतदारसंघांचा झारखंड गेल्यानंतर तेथून आता ४० खासदार लोकसभेत जातात. कालपर्यंत तेथे एनडीएचे म्हणजे संयुक्त जनता दल आणि भाजपचे ३९ खासदार होते. हे चित्र २०२४ मध्ये नसेल. भाजपसाठी ही चिंतेची बाब ठरू शकते.

गेली काही वर्षे नितीश यांची बिहारमधली लोकप्रियता सातत्याने घसरत आहे. ते मोदींप्रमाणेच वयस्कर होत आहेत. मात्र, मुख्यमंत्रिपद सांभाळताना ते इतर राज्यांमध्ये गेलेले नाहीत. त्यांना अर्थातच पंतप्रधान व्हायचे आहे. स्वच्छ प्रतिमा, प्रशासनाचा दांडगा अनुभव, मवाळ स्वभाव आणि शहरी, निमशहरी मतदारांना अपील होऊ शकेल, असे ऋजू, हसतमुख व्यक्तिमत्व या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. एका वर्षापूर्वी एका गप्पाष्टकात नितीश यांनी वाजपेयी यांच्या उदारचरिताची आठवत काढत 'गेले ते दिन गेले..' अशी व्याकूळता व्यक्त केली होती. तो रोख मोदींवर होता. त्याचवेळी, आता बिहारचे मुख्यमंत्री कितीवेळा आणि कितीकाळ व्हायचे, असेही ते म्हणाले. या दोन्हींचा अर्थ आता दिल्लीकडे कूच करण्याची वेळ आली आहे. लोकसभा निवडणुकांना २० महिने आहेत. बंगाल जिंकल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रीय पातळीवर मोठी जुळवाजुळव सुरू केली. ती अद्याप फळलेली नाही.

## ।। अभंगवाणी ।।



परिमळ म्हणूनी चोळूं नये फूल ।  
खाऊं नये मूल आवडतें ॥१॥  
मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद ।  
यंत्र भेदुनि नाद पाहूं नये ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

**शिक्षणाधिकाऱ्यांचे आदेश! ...तर अतिरिक्त शिक्षकांचे ऑगस्टपासून वेतन बंद**

। सोलापूर । महाईन्यूज ।

अतिरिक्त शिक्षकांना सामावून घ्यायला शाळा तयार नाहीत. दुसरीकडे काही शिक्षकांना त्यांना हवी असलेली शाळा न मिळाल्याने संबंधित शाळेत हजर झालेले नाहीत. या पार्श्वभूमीवर आता जे शिक्षक समायोजनाने मिळालेल्या शाळेत रुजू होत नाहीत, त्यांना ऑगस्टपासून वेतन मिळणार नाही, असे आदेश प्राथमिक शिक्षणाधिकारी किरण लोहार यांनी काढले आहेत.

जिल्ह्यातील ९९ अतिरिक्त शिक्षकांचे गुरुवारी (ता. ११) समायोजन करण्यात आले. त्यासाठी जिल्ह्यातील ज्या शाळांमध्ये रिक्तपदे आहेत, त्याठिकाणी त्यांना संधी देण्यात आली आहे. पण, अनेक शिक्षक घरापासून दूरवरील शाळा मिळाली, आपल्याला सांभाळून घेणारा स्टाफ नाही म्हणून त्या शाळेवर रुजूच झालेले नाहीत. विद्यार्थ्यांची शिक्षकांअभावी गैरसोय होऊ नये, त्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ नये म्हणून प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केले. परंतु, त्यांनी स्वत:च्या सोयीसाठी दुसरी

## उद्धव ठाकरें याची चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर खोचक टीका

# त्यांनी कितीही कुळे उतरली तरी शिवसेना भीत नाही!

## जे. पी. नड्डांच्या विधानावर दिलं प्रत्युत्तर!

। मुंबई । महाईन्यूज ।



शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुख्यमंत्रीपदावरून पायउतार झाल्यापासून शिवसेना भवनातून शिवसैनिकांच्या भेटीगाठी घेत आहेत. या काळात त्यांनी एकनाथ शिंदे गटावर अनेकदा टीका केली. मात्र, आज 'मार्मिक' व्यंगचित्र साप्ताहिकाच्या ६२व्या वर्धापनदिनी बोलताना उद्धव ठाकरेंनी भाजपावर आणि विशेषत: भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यावर तोंडसुख घेतलं. नड्डा यांनी काही दिवसांपूर्वी केलेल्या विधानाचा उल्लेख करत उद्धव ठाकरेंनी त्यावरून भाजपाला लक्ष्य केलं. तसेच, भाजपाचे नव्यानेच नियुक्त झालेले महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा उल्लेख करत त्यांच्यावर देखील खोचक शब्दांत टिप्पणी केली.

'मार्मिक'च्या वर्धापनदिनी बोलताना उद्धव ठाकरेंनी राज्यात नव्याने स्थापन झालेल्या एकनाथ शिंदे सरकारवर टीकास्त्र सोडलं. "राज्यात काही ठिकाणी अतिवृष्टी झाली आहे. पण महाराष्ट्रातलं सरकार आहे कुठे? काहीही न करता स्वत:चे सत्कार करून घेतले जात आहेत. पण अतिवृष्टीमुळे शेतकरी हवालदील झाला आहे. तिकडे जायला मंत्री कुठे आहेत? मंत्र्यांचं खातेवाटपच झालेलं नाही. सगळे मंत्री आज 'आझाद' आहेत. आझादी का अमृत महोत्सव. पदं मिळाली आहेत, पण जबाबदारी नाहीये. करा मजा", असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. नड्डांच्या विधानाचा घेतला समाचार

दरम्यान, जे. पी. नड्डांच्या एका विधानाचा उल्लेख करत त्यांनी त्यावर प्रत्युत्तर दिलं आहे. "८-१० दिवसांपूर्वी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डांनी केलेलं वक्तव्य लोकशाहीला घातक आहे की नाही, हा विचार करायला हवा. ते म्हणाले, की या देशात एकच पक्ष राहणार आहे, बाकीचे पक्ष संपत चालले आहेत. विशेषत: शिवसेना संपत चाललेला पक्ष आहे. बघू", असं उद्धव ठाकरे म्हणाले.

### "बावनकुळेंच्या नावात किती कुळे आहेत?"

"नड्डांनी जे प्रदेशाध्यक्ष नेमले आहेत, त्यांच्या नावात किती कुळे आहेत हे मला माहिती नाही. पण त्यांची कितीही कुळं उतरली, तरी शिवसेना संपवणं शक्य नाही. मग ती बावन असतील किंवा एकशे बावन असतील. त्याने मला फरक पडत नाही", असं म्हणत उद्धव ठाकरेंनी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर खोचक टिप्पणीदेखील केली.

### "..तर तो अमृत महोत्सव कसला?"

"देशाची मांडणी संघराज्य पद्धतीची आहे. त्यात अनेक राज्य एकत्र आले आहेत. मग नड्डांना नेमकं काय म्हणायचंय? प्रादेशिक पक्ष संपवायचेत म्हणजे तुम्हाला संघराज्य पद्धत संपवायची आहे का? संघराज्य तुम्हाला नको आहेत का? तुम्ही गादीवर बसलात म्हणून 'हम करे सो कायदा' ही काही लोकशाही नाही. अमृतमहोत्सवी वर्षात लोकशाही मृतावस्थेत न्यायची असेल, तर तो अमृत महोत्सव कसला?" असा सवाल उद्धव ठाकरेंनी यावेळी उपस्थित केला.

"७५व्या वर्धापनदिनी आपण नेमके कुठे आहोत, याचा आढावा सगळ्यांनी घेणं गरजेचं आहे. सरकारने कार्यक्रम दिलाय हर घर तिरंगा... पण ज्यांच्याकडे घरच नाही, ते तिरंगा लावणार कुठे?" असंही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

---

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना पुन्हा आपण गुलामगिरीकडे जात आहोत का?

## "मंत्र्यांना पदं मिळाली आहेत, पण...", उद्धव ठाकरेंची शिंदे सरकारवर परखड टीका!

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यात एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर महिन्याभराने अखेर मंत्रीमंडळ विस्ताराला मुहूर्त सापडला. मात्र, अद्याप मंत्र्यांना खातेवाटप करण्यात आलेलं नाही. या पार्श्वभूमीवर विरोधकांकडून सरकारवर तोंडसुख घेतलं जात असताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज एकनाथ शिंदे सरकारवर परखड शब्दांत टीका केली आहे. 'मार्मिक' व्यंगचित्र साप्ताहिकाच्या ६२व्या वर्धापनदिनी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमातून उद्धव ठाकरेंनी ऑनलाईन संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.



### शिंदे गटाला उद्धव ठाकरेंनी सुनावलं!

आम्हीच मूळची शिवसेना असा दावा करणाऱ्या शिंदे गटाला उद्धव ठाकरेंनी टोला लगावला आहे. "काही जणांना असं वाटतं की शिवसेना उघड्यावर पडलेली वस्तू आहे जी कुणीही उचलून घेऊन जाऊ शकतं. पण तसं नाहीये. शिवसेनेची पाळंमुळं ही किमान ६२ वर्ष तरी दिसत आहेत. माझ्या आजोबांनी ही विचारांची पेरणी केली होती", असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

"मंत्री आहेत कुठे?"

दरम्यान, राज्यात अद्याप खातेवाटप न झाल्याच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंनी राज्य सरकारला सवाल केला आहे. "राज्यात काही ठिकाणी अतीवृष्टी झाली आहे. पण महाराष्ट्रातलं सरकार आहे कुठे? काहीही न करता स्वत:चे सत्कार करून घेतले जात आहेत. पण अतिवृष्टीमुळे शेतकरी बेहाल झाला आहे. तिकडे जायला मंत्री कुठे आहेत? मंत्र्यांचं खातेवाटपच झालेलं नाही. सगळे मंत्री आज आझाद आहेत. आझादी का अमृत महोत्सव. पदं मिळाली आहेत, पण जबाबदारी नाहीये.

---

## "त्या दोघांचा एक आवडता शब्द झाला आहे, तो म्हणजे...", अजित पवारांचा एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीसांना टोला!



। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यात महिन्याभरापूर्वी झालेल्या राजकीय भूकंपामध्ये महाविकास आघाडीचं सरकार कोसळून एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार अस्तित्वात आलं. जवळपास महिन्याभरानंतर सरकारच्या मंत्रीमंडळ विस्ताराला मुहूर्त लागला. मात्र, अद्याप या मंत्र्यांना खातेवाटप झालेलं नाही. या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांकडून सरकारच्या कार्यपद्धतीवर टीका केली जात आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंत्रीमंडळ विस्तार आणि नंतर खातेवाटपाला उशीर होत असल्याचा आरोप देखील विरोधकांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी शिंदे-फडणवीसांना खोचक टोला लगावला आहे.

# 'हर घर तिरंगा' मोहिमेची पंतप्रधान मोदींच्या हस्ते दिमाखात सुरुवात!

## अमित शहांनी सुद्धा शासकीय निवासस्थानी फडकावला तिरंगा

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

देशात सर्वत्र स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत आहे. देश स्वातंत्र्याची 75 वर्षे पूर्ण करत आहेत. देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहे. आजपासून म्हणजेच 13 ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या 'हर घर तिरंगा' मोहिमेत संपूर्ण देशाने सहभागी होण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. केंद्र सरकारने सुद्धा देशभरात विवविध उपक्रमाचं आयोजन करण्यात आले आहे. या स्वातंत्र्यदिनी प्रत्येक घराघरात तिरंगा फडकावा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं होते. याच क्रमाने घरोघरी तिरंगा मोहीम सुरू झाली आहे. पंतप्रधानांनी रक्षाबंधनाच्या दिवशी आपल्या निवासस्थानी लहान मुलांना तिरंगा वाटून मोहिमेची सुरुवात केली त्यानंतर गृहमंत्री अमित शहा यांनी आज त्यांच्या पत्नी सोनल शाह यांच्यासह शासकीय निवासस्थानी तिरंगा फडकावला.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आगळ्यावेगळ्या पद्धतीने लहान मुलांसोबत 'हर घर तिरंगा' या मोहिमेची दिमाखात सुरुवात केली. अमृत महोत्सवाचा आनंद देशात सर्वत्रच पहायला मिळतो आहे. आज पासून सुरु झालेल्या 'हर घर तिरंगा' या मोहीमध्ये देशातील विविध भागातील मंडळींनी सहभाग घेतला आहे. 1) 'हर घर तिरंगा मोहिमेची अनोख्या पद्धतीने सुरू करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या शासकीय निवासस्थानी रक्षाबंधन उत्सवात सहभागी होणाऱ्या प्रत्येक लहान मुलाला 'तिरंगा' भेट म्हणून दिला. 2) केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि त्यांच्या पत्नी सोनल शहा यांनी आज 'हर घर तिरंगा' मोहिमेला सुरुवात करताना त्यांच्या शासकीय निवासस्थानी तिरंगा फडकावला. 3) उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी लखनऊ येथील त्यांच्या मुख्यमंत्री म्हणजेच शासकीय निवासस्थानी शाळकरी मुलांसोबत 'हर घर तिरंगा' मोहिमेला सुरुवात केली.

## शॉर्ट न्यूज »

### स्वातंत्र्याच्या 'अमृतकाळा'त दूरदर्शन करणार राष्ट्रवादाचा जागर !

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

देशाच्या ग्रामीण व दुर्गम भागापर्यंत निशुल्क पोचणारी एकमेव वाहिनी असलेल्या दूरदर्शन या सरकारी प्रसारण संस्थेने अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिनानिमित्त राष्ट्रभक्ती व राष्ट्रवादाचा जागर करण्यासाठी अनेक कार्यक्रम प्रसारित करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वातंत्र्य चळवळीतील ज्ञात-अज्ञात घटना यानिमित्ताने जगासमोर आणणारी 'स्वराज - भारत के स्वतंत्रता संग्राम की समग्र गाथा' हे ७५ भागांचे हिंदी धारावाहिक उद्यापासून (ता. १४) दर रविवारी रात्री ९ वाजता डीडी नॅशनल वाहिनीवर प्रसारित करण्यात येणार आहे. दूरदर्शन हे खासगी वाहिन्यांच्या टीआरपी शर्यतीत न पळणारे माध्यम आहे. आकाशवाणीप्रमाणेच बातम्यांची तटस्थता कठोरपणे पाळणारे प्रसारमाध्यम म्हणूनही त्याचा लौकिक होता.

# चेन्नई विमानतळावर तब्बल 100 कोटींचे ड्रग्ज जप्त

## सीमा शुल्क विभागाची मोठी कारवाई

।नवी दिल्ली । ।महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी ।

चेन्नई विमानतळावर सीमा शुल्क विभागाने मोठी कारवाई करत 100 कोटींचे ड्रग्ज जप्त केले. इथोपियातून आलेल्या एका विमान प्रवाशाकडून 100 किलो वजनाचे कोकेन आणि हेरॉईन जप्त करण्यात आले आहे. या अंमली पदार्थांची किंमत बाजारात 100 कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. इथिओपियाच्या आदिस अबाबा येथून शुक्रवारी चेन्नईला आलेल्या इथिओपियन एअरलाइन्सच्या सर्व प्रवाशांची तपासणी करण्यात आली. दरम्यान या तपासणीत इक्बाल बी उरंदडी या 38 वर्षीय भारतीय प्रवाशाकडून हे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.



हवाई गुप्तचर युनिटचे अधिकारी अनिल कुमार यांनी दिलेल्या माहितीवरुन ही कारवाई करण्यात आली आहे. आफ्रिकेतून येणाऱ्या कुठल्यातरी व्यक्तीकडे अंमली पदार्थांचा साठी असल्याची माहिती अधिकाऱ्यांना मिळाली होती. मात्र, ज्यावेळी इक्बाल या भारतीय प्रवाशाची तपासणी केल्यानंतर त्याने उडवाउडवीची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सीमा शुल्क विभागाने त्याची चौकशी केल्यानंतर सुमारे 100 कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. किती किलोचे सापडले अमली पदार्थ?

सीमा शुल्क विभागाने चौकशी केल्यानंतर जवळपास साडे नऊ किलोचे कोकेन आणि हेरॉईन अधिकाऱ्यांना सापडले आहे. तसेच इक्बालची कसून चौकशी केल्यानंतर त्याला ताब्यात घेण्यात आले. एनडीपीएस कायद्यानुसार हा सर्व माल जप्त करण्यात आला आहे.

दरम्यान, जुलै महिन्यात एका टांझानियन प्रवाशाकडून 8.86 कोटींचे हेरॉईन चैन्नई विमानतळावरच जप्त करण्यात आले होते. त्यानंतर आता ऑगस्टमध्ये ही दुसरी मोठी कारवाई करण्यात आली आहे.

# RBI चा कर्जदारांना दिलासा;

## रिकव्हरी एजंट्ससाठी नवीन सूचना जारी

।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (RBI) शुक्रवारी वसुली एजट्सना नवीन सूचना जारी केल्या आहेत. या सूचनांनुसार वसुली एजट्स आता कर्जदारांना सकाळी 8 वाजण्यापूर्वी आणि संध्याकाळी 7 नंतर कॉल करू शकणार नाहीयेत.



या संदर्भात अधिसूचना जारी करताना RBI ने म्हटले आहे की, बँका, नॉन-बँकिंग फायनान्स कंपन्या (NBFCs) आणि मालमत्ता पुनर्रचना कंपन्या (ARCs) यांनी कर्जाच्या वसुलीशी संबंधित त्यांच्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करणे गरजेच असल्याचे स्पष्ट केले आहे. याशिवाय, आरबीआयने कर्जदारांना कोणत्याही प्रकारचे अनुचित संदेश पाठवणे, धमकी देणे किंवा अज्ञात नंबरवरून कॉल टाळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आरबीआय कर्जाच्या वसुलीच्या मुद्द्यांवर वेळोवेळी मार्गदर्शक तत्त्वे जारी करत असते. नियमन केलेल्या संस्थांनी कर्जदारांना त्रास देऊ नये असे यापूर्वी म्हटले होते. परंतु अलिकडच्या काळात रिकव्हरी एजंट्सकडून होत असलेल्या अन्यायकारक कारवाया पाहता, आरबीआयने नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. मध्यवर्ती बँकेने म्हटले आहे की ही मार्गदर्शक तत्त्वे सर्व व्यावसायिक बँका, सहकारी बँका, NBFC, ARC आणि अखिल भारतीय वित्तीय संस्थांना लागू होतील. RBI ला 1 एप्रिल 2021 ते 3 मार्च 2022 पर्यंत बँका आणि NBFC विरुद्ध 7,813 तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर वरील सूचना जारी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार आता कोणतीही बँक सकाळी 8 वाजण्यापूर्वी आणि संध्याकाळी 7 नंतर वसुलीसाठी कोणतेही संदेश किंवा कॉल करू शकणार नाहीये.

# 'ती माझी प्रेमकथा' हा दमदार चित्रपट 30 सप्टेंबरला होतोय रिलीज




आयुष्यात प्रत्येकजन एकदा का होईना प्रेमात पडतोच. तर प्रत्येकाची प्रेम व्यक्त करण्याची भाषा ही निरनिराळी असते, काहींचे प्रेम हे सफल होते तर काहींना प्रेमात यातना सहन कराव्या लागतात. प्रेमात एक गोष्ट खूप महत्वाची असते ती म्हणजे विश्वास, मात्र प्रेमींमधील हा विश्वास डगमगला तर त्या प्रेमाचे पुढे काय होते हे 'फिल्मी टाईम प्रोडक्शन' सह आणि 'कनिष्क अँड त्रिगेश एंटरटेनमेंट' सोबत निर्माते राजकुमार देगलूरकर, ओमप्रकाश बुकव्वर निर्मित 'ती माझी प्रेमकथा' या प्रेममय चित्रपटातून येत्या 30 सप्टेंबरला प्रेक्षकांसमोर येणार आहे. एकुणच हा चित्रपट फक्त प्रेमकथा नसून आजच्या तरूण पिढीला एक मोठा संदेश आहे. नुकतेच या चित्रपटाचे रोमँटिक पोस्टर सिनेरसिकांच्या भेटीस आले आहे.

अभिनेत्री पद्मिनी कांबळे आणि अभिनेता तुषार धाकीते या नव्या कोऱ्या जोडीने 'ती माझी प्रेमकथा' या चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण केले आहे. पद्मिनी आणि तुषारची लव्हेबल केमिस्ट्री या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. नवोदित कलाकारांनी या चित्रपटात प्रेमाचे काय रंग उधळलेत हे पाहणे या चित्रपटात खरंच रंजक ठरेल. विशेष म्हणजे या चित्रपटात सुप्रसिद्ध अभिनेते उपेंद्र लिमये ही झळकणार आहेत, तर भोंगा फेम कपिल कांबळे या चित्रपटात तुषारच्या मित्राच्या भूमिकेत दिसणार आहे. दिग्दर्शक सूर्या यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन, कथा आणि स्क्रीनप्ले अशा तीनही जबाबदाऱ्या उत्तम पेलवल्या आहेत. तर या चित्रपटाच्या एक्झिक्युटिव्ह प्रोड्युसरची जबाबदारी कपिल जोंधळे यांनी सांभाळली आहे. तर या रोमँटिक चित्रपटाच्या संगीताची धुरा राजवीर गांगजी याने पेलवली.

## अनन्या-विजय पोहोचले पंजाबच्या शेतात; ट्रॅक्टरवरील फोटोने वेधले साऱ्यांचे लक्ष

बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडे आणि दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकोंडा सध्या त्यांच्या 'लायगर' या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. हा चित्रपट येत्या २५ ऑगस्टला प्रदर्शित होणार आहे. प्रमोशनसाठी वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब करताना ते दिसत आहेत.
या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी अनन्या आणि विजयने मुंबईच्या लोकलमधून देखील प्रवास केला होता. आता ते दोघे चित्रपटातील नव्या गाण्याच्या प्रमोशनसाठी थेट चंदीगढला पोहोचले आहेत.
तिने या



फोटोला खास कॅप्शन दिले आहे. 'कोका २.०' हे 'लायगर' चित्रपटातील नवे गाणे लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या गाण्याच्या प्रमोशनसाठी अनन्या आणि विजय देवरकोंडा यांनी 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे'मधील सीन रिक्रिएट केला. मुंबई लोकलमधून प्रवास, बीचवरील फोटोशूट यानंतर आता अनन्या आणि विजय यांनी थेट पंजाबमधील शेतांमध्ये ट्रॅक्टरमधून चित्रपटातील नव्या गाण्याचे प्रमोशन केले. दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' हा चित्रपट शाहरुख खान आणि काजोल यांच्यावर चित्रित झालेला आयकॉनिक चित्रपट आहे. या चित्रपटामधील सीन अनन्या पांडे आणि विजय देवरकोंडा यांनी रिक्रिएट केला. याचे फोटो अनन्याने इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत. या फोटोसोबत 'प्यार होता है दिवाना सनम असे कॅप्शन तिने दिले आहे.

## बॉक्स ऑफिसवर डळमळणाऱ्या लाल सिंग चड्ढाचं नाव जोडलं जातंय ऑस्करशी!



बॉलीवूड सुपरस्टार आमिर खानचा(AAMIR KHAN) सिनेमा लाल सिंग चड्ढा भलताच वादात सापडला आहे. हॉलीवूड सिनेमा फॉरेस्ट गम्पच्या या हिंदी व्हर्जनला भले मोठ्या संख्येनं लोकांचा विरोध असला तरी ऑस्करच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर या सिनेमाला पाठिंबा दर्शवण्यात आला आहे. आता आमिर खानला नक्कीच प्रतिक्षा असेल ते आपल्या लाल सिंग चड्ढावर सुपरस्टार टॉम हँक्स काय प्रतिक्रिया देतोय.(
ऑस्कर अकादमीच्या सोशल मीडिया अकाउंटवर एक व्हिडीओ क्लीप शेअर करण्यात आली आहे,ज्यात ओरिजनल फॉरेस्ट गम्प आणि हिंदी व्हर्जन लाल सिंग चड्ढा मधील एक सीन दाखवण्यात आला आहे. या व्हिडीओला शेअर करत लिहिलं गेलं आहे की, "रॉबर्ट जेमेकिस आणि रोथन लिहिलेली कथा ज्यामध्ये एक माणूस आपल्या उदारमतवादी स्वभावानं जग जिंकतो,याचं अद्वैत चंदन आणि अतुल कुलकर्णी यांनी भारतीय रुपांतरण करताना लाल सिंग चड्ढा लिहिला. सिनेमात मुख्य भूमिकेत आमिर खान आहे,जी भूमिका हॉलीवूड स्टार टॉम हँक्सने फॉरेस्ट गम्पमध्ये साकारली होती,अन् प्रसिद्ध केली होती".

## स्वतःचा स्टुडिओ स्थापन करणारी पहिली मराठी यूट्यूबर

उर्मिला निंबाळकरला खरी ओळख दिली ती सोशल मीडियाने एका इंस्टाग्राम पोस्टमध्ये तिने लिहिले, 'शेवटी... आम्ही आमचा स्वतःचा यूट्यूब स्टुडिओ बनवला आणि तिथे आम्ही आमचे पहिले शूट केले. चार वर्षांपूर्वी आमचा



MEDIA). एका इंस्टाग्राम पोस्टमध्ये तिने लिहिले, 'शेवटी... आम्ही आमचा स्वतःचा यूट्यूब स्टुडिओ बनवला आणि तिथे आम्ही आमचे पहिले शूट केले. चार वर्षांपूर्वी आमचा यूट्यूबचा प्रवास मोबाईलवर सुरू

यूट्यूबचा प्रवास मोबाईलवर सुरू झाला. तेव्हा लाईट नव्हती, माईकचे बजेट नव्हते. त्यामुळे जोपर्यंत आऊटडोअर लायटिंग होती तोपर्यंत शूट संपवावा लागायचा.
प्रत्येक महिन्यात वाटायचं की आपण चॅनल बंद करावं. मात्र, चुकांमधून शिकले. विषयांवर काम केले. प्रेक्षकांशी आणि स्वतःशी प्रामाणिक राहून काम करीत राहिलो. मग 'लोग साथ आते और करवता बन गया', असे उर्मिलाने पोस्टमध्ये सांगितली. उर्मिलाचे पती सुकृत यानेही पत्नीचे यश इन्स्टाग्राम हँडलवर शेअर केले आहे. उर्मिला निंबाळकरला खरी ओळख दिली ती सोशल मीडियाने (SOCIAL

झाला. तेव्हा लाईट नव्हती, माईकचे बजेट नव्हते. त्यामुळे जोपर्यंत आऊटडोअर लायटिंग होती तोपर्यंत शूट संपवावा लागायचा.
प्रत्येक महिन्यात वाटायचं की आपण चॅनल बंद करावं. मात्र, चुकांमधून शिकले. विषयांवर काम केले. प्रेक्षकांशी आणि स्वतःशी प्रामाणिक राहून काम करीत राहिलो. मग 'लोग साथ आते और करवता बन गया', असे उर्मिलाने पोस्टमध्ये सांगितली. उर्मिलाचे पती सुकृत यानेही पत्नीचे यश इन्स्टाग्राम हँडलवर शेअर केले आहे.

## अभिनेत्री क्षिती जोग दिसणार करण जोहरच्या हिंदी चित्रपटात..

मराठी अभिनेत्रींमध्ये एक दिग्गज नाव म्हणजे क्षिती जोग. क्षितीने आजपर्यंत अनेक भूमिका तिच्या अभिनयाने गाजवल्या आहेत. 'झिम्मा' या चित्रपटातील तीची भूमिका सर्वानाच भावली. क्षितीने केवळ मराठी मालिका, चित्रपट केले नाही तर तिने हिंदीतही मजल मारली. या आधी तिने तापसी पन्नूची प्रमुख भूमिका असलेला 'रश्मी रॉकेट' हा चित्रपट केला होता. आता ती बॉलीवुडच्या एका बिगबजेट सिनेमात दिसणार आहे.

## शॉर्ट न्यूज »

### झिम्बाब्वे दौऱ्यासाठी लक्ष्मण मुख्य प्रशिक्षक



**नवी दिल्ली । महाईन्यूज**

राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मणची झिम्बाब्वे दौऱ्यासाठी भारतीय क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली आहे, अशी माहिती 'बीसीसीआय'चे सचिव जय शहा यांनी दिली.

आशिया चषक स्पर्धेपूर्वी हा दौरा होणार आहे. आशिया चषक आणि झिम्बाब्वे दौरा यांच्यात खूपच कमी अंतर आहे. झिम्बाब्वे दौऱ्यात तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवण्यात येणार असून, अखेरचा सामना २२ ऑगस्ट रोजी होणार आहे. आशिया चषकासाठी भारतीय संघ प्रशिक्षक द्रविडसह २३ ऑगस्ट रोजी संयुक्त अरब अमिरातीत दाखल होणार आहे. त्यामुळेच झिम्बाब्वे दौऱ्यासाठी लक्ष्मणकडे प्रशिक्षकपदाची जबाबदारी सोपवल्याचे शाह यांनी सांगितले.

# बांगलादेशचे कर्णधारपद पुन्हा शाकीबकडे; आशिया चषकासाठी संघाची घोषणा!

## शाकीब अल हसनची कर्णधारपदी नियुक्ती केली आहे.

**। हेलसिंकी। महाईन्यूज ।**

येत्या २७ ऑगस्टपासून संयुक्त अरब अमिरातीमध्ये (युएई) आशिया चषक खेळवला जाणार आहे. या संपूर्ण स्पर्धेचे वेळापत्रक काही दिवसांपूर्वीच जाहीर करण्यात आले आहे. तेव्हापासून स्पर्धेत संघांची निवड कधी होणार याची प्रतिक्षा चाहत्यांना होती. आता ही प्रतिक्षा संपली आहे. पाकिस्तान, श्रीलंका आणि भारतापाठोपाठ बांगलादेश क्रिकेट नियामक मंडळाने आशिया चषकासाठी आपल्या संघाची घोषणा केली आहे. याशिवाय, आशिया चषक आणि टी २० विश्वचषकासाठी कर्णधाराची निवडही करण्यात आली आहे.बांगलादेश क्रिकेट नियामक मंडळाने शाकीब अल हसनची कर्णधारपदी नियुक्ती केली आहे. याशिवाय संघात मुशफिकुर रहीम, सब्बीर रहमान, इबादत हुसेन आणि मोहम्मद सैफुद्दीन यांचेही पुनरागमन झाले आहे. मुनीम शहरयार, नजमुल हुसेन आणि शरीफुल इस्लामला संघात स्थान मिळालेले नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे बांगलादेश क्रिकेट नियामक



मंडळाने नुरुल हसनचा संघात समावेश केला आहे. आशिया चषकाचे आयोजन श्रीलंकेत केले जाणार होते. मात्र, तेथील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक स्थिती बघता आशिया चषक श्रीलंकेतून यूएईमध्ये हलवण्यात आला आहे. स्पर्धा जरी श्रीलंकेत होणार नसली तरी, लंकेकडे यजमान पदाचे सर्व अधिकार असतील. ग्रुप स्टेजच्या सामन्यांनंतर 'सुपर फोर' टप्पा असेल आणि सर्वोत्तम दोन संघ अंतिम फेरीत पोहोचतील. आशिया चषक स्पर्धेसाठी निवड झालेला बांगलादेश संघ : शाकीब अल हसन (कर्णधार), अनामूल हक, मुशफिकुर रहीम, अफिफ हुसेन, मोसाद्देक हुसेन, महमुदुल्लाह, महेदी हसन, मोहम्मद सैफुद्दीन, हसन महमूद, मुस्तफिजुर रहमान, नसुम अहमद, सब्बीर रहमान, मेहदी हसन मिराझ, इबादोत हुसेन, परवेझ हुसेन इमोन, नुरुल हसन सोहन आणि तस्किन अहमद.

# भारत-पाकिस्तान सामन्यात भारतीय फलंदाज ठरणार वरचढ?

## शाहीन आफ्रिदीच्या खेळण्याबाबत शंका

**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।**

येत्या २७ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर या कालावधीमध्ये आशिया चषक खेळवला जाणार आहे. या संपूर्ण स्पर्धेचे वेळापत्रक आणि भारतीय संघाची घोषणा काही दिवसांपूर्वीच झाली आहे. या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तानचा संघ आमनेसामने येणार आहे. दोन्ही देशांदरम्यान २८ ऑगस्ट रोजी सामना रंगणार आहे. त्यामुळे आशिया चषकाबाबत क्रिकेट चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आहे. अशातच पाकिस्तान संघासाठी एक वाईट बातमी समोर आली आहे. आशिया चषकापूर्वी पाकिस्तानचा प्रमुख गोलंदाज शाहीन आफ्रिदी जखमी झाला आहे.

पाकिस्तानचा प्रमुख वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदीला काही दिवसांपूर्वी दुखापत झाली होती. त्यामुळे तो श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यातही खेळू शकला नव्हता. आशिया चषकापूर्वी नेदरलँड्सविरुद्ध



होणाऱ्या मालिकेत त्याची निवड तर झाली आहे. मात्र, त्याच्या खेळण्याबाबत साशंकता आहे. 'नेदरलँड्समध्ये शाहीनला डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवले जाणार आहे,' अशी माहिती संघाचा कर्णधार बाबर आझमने दिली आहे. शाहीन आफ्रिदी पाकिस्तानचा प्रमुख आणि महत्त्वाचा वेगवान गोलंदाज आहे. गेल्यावर्षी (२०२१) झालेल्या टी २० विश्वचषकात खेळल्या गेलेल्या भारत आणि पाकिस्तान सामन्यात शाहीनने भारतीय फलंदाजांना अडचणीत आणले होते. त्याने केएल राहुल, विराट कोहली आणि रोहित शर्माला बाद केले होते. त्यामुळे त्याची संघातील उपस्थिती आणि अनुपस्थिती दोन्हीही पाकिस्तानच्या संघासाठी महत्त्वाची आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही